महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : दुसरे अंक : १७८ वा दिनांक : १८/०४/२०२५ वार : शुक्रवार

# महाराष्ट्रात हिंदीची सक्ती खपवून घेणार नाही : राज ठाकरे



**मुंबई** : महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी महाराष्ट्रात पहिलीपासून हिंदी भाषा अनिवार्य करण्यास कडाडून विरोध केला आहे. मनसे हिंदीची सक्ती कोणत्याही स्थितीत खपवून घेणार नाही. या प्रकरणी आम्ही सरकारचे सर्वत्र 'हिंदीकरण' करण्याचे प्रयत्न यशस्वी होऊ देणार नाही, असे त्यांनी सरकारला निर्वाणीचा इशारा देताना म्हटले आहे.

राज ठाकरे आपल्या पोस्टमध्ये म्हणतात, राज्य शालेय अभ्यासक्रम आराखडा २०२४ नुसार महाराष्ट्रात पहिलीपासूनच हिंदी ही भाषा अनिवार्य करण्यात आली आहे. मी स्वच्छ शब्दांत सांगतो की ही सक्ती महाराष्ट्र नवनिर्माण सेना खपवून घेणार नाही.

सरकारचं सध्या जे सर्वत्र 'हिंदीकरण' करण्याचे प्रयत्न सुरू आहेत, ते या राज्यात आम्ही यशस्वी होऊ देणार नाही. हिंदी ही काही राष्ट्रभाषा नाही. ती देशातील इतर भाषांसारखी एक राज्यभाषा आहे. ती महाराष्ट्रात का म्हणून पहिलीपासून शिकायची ? तुमचं त्रिभाषेचं सूत्र जे काही आहे, ते सरकारी व्यवहारांपुरतंच मर्यादित ठेवा, त्याला शिक्षणापर्यंत आणू नका. या देशात भाषावार प्रांतरचना झाली, आणि ती इतकी वर्ष टिकली. पण आत्ताच ही दुसऱ्या प्रांताची भाषा इथे महाराष्ट्रावर लादण्याचे प्रकार का सुरु झालेत? भाषावार प्रांतरचनेच्या तत्वालाच हरताळ फासला जात आहे.

प्रत्येक भाषा ही सुंदरच असते आणि तिच्या घडण्याच्या मागे एक दीर्घ इतिहास असतो, परंपरा असते. आणि ती ज्या राज्याची भाषा असते, त्या राज्यात तिचा सन्मान राखलाच गेला पाहिजे. महाराष्ट्रात जसा मराठीचा सन्मान इतर भाषिकांकडून राखला गेला पाहिजे, तसा सन्मान इतर राज्यात त्या भाषेचा सर्व भाषिकांकडून राखला गेला पाहिजे. अगदी इतर राज्यात राहणाऱ्या मराठी जनांनी त्या राज्याची भाषा आपली मानली पाहिजे हा आमचा आग्रहच आहे. पण हे सोडून या देशाची भाषिक परंपराच खिळखिळी करणार असाल तर ते आम्हाला मान्य नाही.

आम्ही हिंदू आहोत पण हिंदी नाही आहोत ! महाराष्ट्रावर हिंदीकरणाचा मुलामा द्यायचा प्रयत्न कराल तर महाराष्ट्रात संघर्ष अटळ आहे. या सगळ्याकडे पाहिलं तर लक्षात येतं की सरकार हा संघर्ष मुद्दामून घडवत आहे. येणाऱ्या आगामी निवडणुकांमध्ये मराठी विरुद्ध मराठीतर असा संघर्ष घडवून स्वतःचा फायदा काढून घेण्यासाठी हा सगळा अट्टाहास सुरु आहे? या राज्यातील मराठीतर भाषिकांनी पण सरकारचा हा डाव समजून घ्यावा. त्यांना तुमच्या भाषेबद्दल विशेष प्रेम आहे असं काही नाही. त्यांना तुमची माथी भडकवून स्वतःची राजकीय पोळी भाजून घ्यायची आहे.

आज राज्याची आर्थिक अवस्था बिकट आहे, सरकारकडे योजनांसाठी पैसाच शिल्लक नाही. मराठी तरुण-तरुणी नोकरीच्या प्रतीक्षेत आहेत. कर्जमाफी करू असं निवडणुकीच्या आधी सांगितलं, पण पुढे ती केलीच नाही. त्यामुळे कर्जमाफीच्या आशेवर असलेला शेतकरी निराश आहे. आणि उद्योग जगताने महाराष्ट्राकडे पाठ फिरवल्यासारखी परिस्थिती आहे. जेंव्हा सांगण्यासारखं किंवा ठोस दाखवण्यासारखं काहीच नसतं, तेंव्हा फोडा आणि राज्य करा हा ब्रिटिशांचा मंत्र इथे वापरला जातोय, अशी शंका यावी अशीच पाऊलं सरकारकडून उचलली जात आहेत.

बरं हिंदी भाषेची सक्ती महाराष्ट्रातच का ? ही अशी हिंदीची सक्ती दक्षिणेच्या राज्यात कराल का ? आणि करून तर बघा, तिथली सरकारंच पेटून उठतील. इथलं राज्यातील सरकार आणि त्यातील घटक पक्ष निमूटपणे हे सगळं खपवून घेतात म्हणून इथे ही सक्ती केली जात आहे. बाकीच्यांचं आम्हाला माहित नाही आणि आम्हाला देणंघेणं पण नाही, पण महाराष्ट्र नवनिर्माण सेना हे खपवून घेणार नाही.

महाराष्ट्रात पहिलीपासून हिंदी भाषा शिकण्याची सक्ती इथे खपवून घेतली जाणार नाही. शालेय अभ्यासक्रमातील हिंदीची पुस्तकं दुकानांमध्ये विकू दिली जाणार नाहीत आणि शाळांना देखील ती पुस्तकं विद्यार्थ्यांना वाटू दिली जाणार नाहीत, याची नोंद शाळा प्रशासनाने घ्यावी.

प्रत्येक राज्यात फक्त त्यांच्या राजभाषेचाच मान राखला गेला पाहीजे ! उद्या सर्व राज्यांमध्ये मराठी भाषा पहिली पासून शिकवाल का ? नाही ना ? मग ही जबरदस्ती इथेच का ? हा मुद्दा ताणू नये असं माझं सरकारला आवाहन आहे. पण या आवाहनाला आव्हान देणार असाल आणि हिंदी लादणार असाल तर मात्र संघर्ष अटळ आहे आणि ज्याला फक्त सरकारच जबाबदार राहील. त्यामुळे सरकारने लोकभावनेचा आदर करत हा निर्णय मागे तात्काळ घेण्याचे आदेश द्यावेत.

माझ्या महाराष्ट्रातील तमाम मराठी मातांना, भगिनींना आणि बांधवांना तसेच माझ्या मराठी वर्तमानपत्रात आणि मराठी वृत्तवाहिन्यांमध्ये काम करणाऱ्या सर्व बांधवांना आणि भगिनींना देखील विनंती आहे की यात कोणताही वादविवाद न करता याचा निषेध आणि विरोध करावा ! आणि हो महाराष्ट्रातील इतर राजकीय पक्षांना जर थोडं जरी मराठी भाषेबद्दल प्रेम असेल तर ते देखील याला विरोध करतील.

आज भाषा सक्ती करत आहेत, उद्या इतर सक्तीचे फतवे काढतील. म्हातारी मेल्याचे दुःख नाही पण काळ सोकावतो !

## पश्चिम महाराष्ट्रात काँग्रेसला मोठा धक्का : भोरचे मा. आ. भाजपच्या वाटेवर



**पुणे** : काही दिवसांपूर्वी पुण्यातील नेते रवींद्र धंगेकर यांनी काँग्रेसमधून शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश केला होता. हा धक्का पचत नाही, तोच आता काँग्रेसला पुण्यात आणखी एक मोठा धक्का बसला आहे. काँग्रेसचे मातब्बर नेते आणि भोरचे माजी आमदार संग्राम थोपटे हे देखील काँग्रेसची साथ सोडणार असल्याची माहिती समोर आली आहे. संग्राम थोपटे हे २२ एप्रिल रोजी भाजपमध्ये प्रवेश करणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. संग्राम थोपटे यांनी अद्याप काँग्रेसचा राजीनामा दिला नाही. ते सध्या आपल्या कार्यकर्त्यांशी चर्चा करत असून चर्चेनंतर रविवारी काँग्रेसच्या सदस्यत्वाचा राजीनामा देणार असल्याची माहिती आहे.

संग्राम थोपटे हे काँग्रेसचे मोठे नेते असून भोर वेल्हा मुळशी विधानसभा मतदारसंघांमधून सलग तीन वेळा आमदार झालेले आहेत. तर त्यांचे वडील अनंतराव थोपटे यांनी सहा वेळा भोर विधानसभेचे नेतृत्व केले होते. नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे उमेदवार शंकर मांडेकर यांनी संग्राम थोपटे यांना २० हजार मतांनी पराभूत केले होते.

संग्राम थोपटे हे भाजपचे कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या पुढाकाराने भाजपमध्ये प्रवेश करणार असल्याची माहिती आहे. रविवारी राजीनामा दिल्यानंतर ते लवकरच भाजपमध्ये प्रवेश करण्याची शक्यता आहे. येत्या २२ एप्रिल रोजी ते भाजपात प्रवेश करतील. मुंबईत भाजपच्या वरिष्ठ नेत्यांच्या उपस्थितीत हा पक्षप्रवेश सोहळा होईल, असे सांगितले जात आहे.



# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १८ एप्रिल २०२५


## बाबासाहेबांच्या संविधानाने सामान्य माणसांना सन्मानित केले : डॉ. बाळासाहेब लिहिणार




**करमाड :** राजीव गांधी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय करमाड येथे महात्मा ज्योतिबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त डॉ. बाळासाहेब लिहिणार यांचे विशेष व्याख्यान आयोजित केले होते.डॉ.लिहिणार आपल्या भाषणात महात्मा ज्योतिबा फुले यांच्या संदर्भात म्हणाले महात्मा फुले एक असे क्रांतिकारक होते की त्यांनी या देशातील जी विसंगत समाजव्यवस्था होती जी या देशाच्या प्रगतीसाठी हजारो वर्षापासून आडकाठी होती तिलाच उखडून टाकून सत्य शोधकसमाज हा धर्म स्थापन करून एक नवीन समाजव्यवस्था निर्माण करू पाहणारे पाहिले समाज सुधारक होते.महात्मा फुले यांच्या विचाराचा वारसा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी उचलून धरून या देशातील शोषित,पीडित कस्टकरी समाजाला संविधानाच्या माध्यमातून न्याय मिळवून देण्याचे काम डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी केले या संविधानामुळे येथील शोषित समाज सन्मानाने जगू लागला अशी भूमिका डॉ. बाळासाहेब लिहिणार यांनी मांडली. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविदयालयाचे डॉ. मुळे सर यांनी महात्मा ज्योतिबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकताना महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर या वैचारिक गुरु शिष्याची परंपरा संविधानात आली म्हणून महाराष्ट्राला फुले शाहू आंबेडकरांचा महाराष्ट्र म्हणून ओळखतात असे उदगार काढून अध्यक्षीय समारोप केला.या कराक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.काळे यांनी केले तर प्रास्ताविक लोकप्रशासन विभागाचे प्रमुख डॉ. कालिदास फड यांनी केले.यावेळी डॉ. अश्विनीकुमार चिंचोलीकर,डॉ लक्ष्मण दांडगे, प्रा. ज्ञानेश्वर लांडगे, प्रा. अर्जुन चव्हाण, रमेश जाधव व बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.






## श्री हनुमंताची छबिना पालखी सोहळा, टाळ-मृदंग गजर, भक्तीत तल्लीन भक्त

### कलाकारांनी सादर केला हनुमानांचा सजीव देखावा,सेल्फी साठी गर्दी



**मुरूम** ता.16, दि.12 रोजी हनुमान जन्मोत्सव सोहळा संपन्न झाला आणि दि.16 रोजी म्हणजेच पाचव्या दिवशी मुरूम शहरातील श्री हनुमान मंदिरातील श्री हनुमंताची छबिना पालखी सोहळा असंख्य भक्तांच्या उपस्थितीत थाटात,भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. शहरातील प्राचीन मंदिर आणि अनेक शतकापासूनची रूढी-परंपरा आजही मंदिर समितीच्या वतीने जोपासले जातात, मंदिर परिसर,गाभारा ते आजरोजी संपूर्ण ग्रामप्रदक्षिणा ने श्री हनुमंताची यात्रा मोठ्या थाटात आणि भक्तिमय वातावरणात संपन्न होत झाला. दि.12 पासून सुरुवात झालेल्या उत्सवाची आजरोजी छबिना पालखीने भक्तिमय वातावरणात सांगता संपन्न झाले. प्रारंभी सकाळची आरती पिया उर्फ संतोष मुदकण्णा व त्यांच्या परिवाराच्या वतीने संपन्न झाला. सायंकाळी श्रीराम कुलकर्णी मित्र मंडळाच्या वतीने पुष्पहार अर्पण करून पूजन संपन्न झाला. किसान चौकातील महादेवाच्या मानाची काठ्याचे मंदिरात आगमन महाआरतीने छबिना आणि पालखी मिरवणुकीस प्रारंभ झाला. विधुत रोषणाईने सजवलेल्या छत्र्या, बँड-बाजा आणि वानेवाडीच्या चिमुकल्याचा भजनी मंडळ, संगमनेर येथील श्री हनुमान,महाकाल यांच्या सजीव देखावाचे सादरीकरण करणारे कलाकार, अशा भरीव संस्कृतीक कार्यक्रमाचे सादरीकरण करत श्री हनुमान चौकापासून ते अशोक चौक,टिळक चौक,किसान चौक,सुभाष चौक,गांधी चौक मार्गे छबिना पालखी टाळ-मृदंगाचे गजरात,भक्तिगीते, भजन,अभंग, श्री हनुमानाचा सजीव देखावेचे सादरीकरण करत मंदिरात पालखी प्रवेश झाला. मिरवणूकी दरम्यान पालखीचे ठिकठिकाणी भक्तिमय वातारणात स्वागत करण्यात आले आले, सुभाष चौकातील टेकाळे,कलशेट्टी परिवाराच्या वतीने पूजन संपन्न झाला. संगमनेरहुन आलेल्या कलाकारांनी मुरूम शहरातील चिमुकल्या पासून ते वयोवृद्ध नागरिकांचे मने जिंकली, सेल्फी साठी गर्दी लोटली. महिला भगिनींनी फुगडी खेळला. अशोक चौकात श्री रामाच्या भक्तित चिमुकल तल्लीन होऊन भजनी मंडळात सहभाग होऊन केलेला नृत्य म्हणजेच आजही घरोघरी धर्म-संस्कृती आणि परंपरा जोपासली जाते यापेक्षा मोठं उदाहरण होऊ शकत नाही. मिरवणूकी दरम्यान जिल्हा बँकेचे चेअरमन बापूराव पाटील,कन्या गीताताई पाटील यांनी दर्शन घेतला. यावेळी प्रशांत पाटील, हनुमान मंदिर विसवस्त मंडळ मुरूमचे अध्यक्ष- ऍड उदय वैध, उपाध्यक्ष जगदीश मीणियार, सदस्य व्यंकटराव जाधव,अशोक मोणियार,डॉ.नितीन डागा,मंदिर पुजारी राम पुजारी,बलभीम पुजारी सह हनुमान युवक मंडळाच्या वतीने छबिना आणि पालखी मिरवणूक यशस्वीपणे पार पाडण्यासाठी परिश्रम घेतले तर मिरवणूक दरम्यान कसल्याही प्रकारचे अनुचित प्रकार घडू नये यासाठी मुरूम पोलीस प्रशासनाच्या वतीने सह्यक पोलीस निरीक्षक संदिप दहिफळे, सहायक पोलिस फौजदार नवनाथ गाडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आले होते.हनुमान जन्मोत्सवला सुरुवात झालेल्या सोहळ्याचे छबिना आणि पालखी ग्रामप्रदक्षिणाने अगदी भक्तिमय आणि शांततेत समारोप संपन्न झाले, मिरवणूकीत असंख्य भाविक भक्तांनी सहभाग घेतला होता, श्री कुलकर्णी यांच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते असंख्य भाविकांनी प्रसादाचा लाभ घेतला. थाटात आणि भक्तिमय वातावरणात सोहळा संपन्न झाला.

## महाराष्ट्र त्रिभाषा धोरण लागू करणारे पहिले राज्य बनले



**मुंबई :** महाराष्ट्र हे त्रिभाषा धोरण लागू करणारे देशातील पहिले राज्य बनले आहे. आता पहिली ते पाचवीच्या मुलांना हिंदी भाषा शिकणे सक्तीचे करण्यात आले आहे. हा निर्णय राज्यातील सर्व मराठी आणि इंग्रजी माध्यमांच्या शाळांना लागू असेल. राष्ट्रीय शिक्षण धोरण (NEP) २०२० च्या नवीन अभ्यासक्रमाला लक्षात घेऊन, महाराष्ट्रात या वर्गासाठी त्रिभाषा धोरण लागू करण्यात आले आहे.

राज्य शालेय शिक्षण विभागाने बुधवारी ही घोषणा केली. शालेय शिक्षणाबाबत NEP २०२० च्या सूचना अनेक टप्प्यात लागू करण्याची योजना असल्याचे शिक्षण विभागाने सांगितले. यासोबतच, ज्या शाळा मराठी आणि इंग्रजी व्यतिरिक्त इतर कोणत्याही माध्यमाचा वापर करत आहेत, त्या आधीच त्रिभाषा धोरणाचे पालन करत आहेत.

कारण या शाळांमध्ये इंग्रजी आणि मराठी शिकवणे अनिवार्य आहे आणि येथे संवादाची भाषा तिसरी भाषा म्हणून शिकवली जात आहे. तर इंग्रजी आणि मराठी माध्यमांच्या शाळांमध्ये अजूनही फक्त दोन भाषा शिकवल्या जात होत्या.

यासह, NEP चे शिफारस केलेले ५+३+३+४ मॉडेल महाराष्ट्रात टप्प्याटप्प्याने लागू केले जाईल. या नवीन रचनेचा पहिला टप्पा नवीन शैक्षणिक वर्षापासून म्हणजेच २०२५-२६ पासून पहिल्या वर्गासाठी लागू केला जाईल.

त्रिभाषा धोरण देखील टप्प्याटप्प्याने लागू केले जाईल. येत्या शैक्षणिक वर्षापासून राज्यातील पहिलीच्या वर्गातील विद्यार्थी तीन भाषा शिकतील.

नवीन अभ्यासक्रमाच्या आराखड्यानुसार, महाराष्ट्र राज्य मंडळाची पाठ्यपुस्तके एनसीईआरटी अभ्यासक्रमावर आधारित असतील. तथापि, सामाजिक शास्त्रे आणि भाषांच्या पुस्तकांमध्ये महाराष्ट्राचा स्थानिक संदर्भ जोडला जाईल. त्यानुसार, बालभारतीकडून प्रथम श्रेणीची पाठ्यपुस्तके प्रकाशित केली जातील. बालभारती हे राज्याचे पाठ्यपुस्तक कार्यालय आहे.

राष्ट्रीय शिक्षण धोरणांतर्गत शाळांमध्ये तीन भाषा शिकवण्याच्या नियमावरून केंद्र सरकार आणि तामिळनाडू सरकारमध्ये वाद सुरू आहे. 16 फेब्रुवारी 2025 रोजी, तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम.के. स्टॅलिन यांनी केंद्रावर ३ भाषा धोरण लागू न केल्याबद्दल ब्लॅकमेलिंग आणि धमकी देण्याचा आरोप केला होता. तसेच, हिंदी भाषा लादल्याचे आणि निधी न दिल्याचे आरोप झाले. त्याला उत्तर म्हणून, केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी 17 फेब्रुवारी 2025 रोजी सांगितले की, केंद्र सरकार राष्ट्रीय शिक्षण धोरण (NEP), २०२० ची अंमलबजावणी करण्यासाठी पूर्णपणे वचनबद्ध आहे.

NEP २०२० अंतर्गत, विद्यार्थ्यांना ३ भाषा शिकाव्या लागतील, परंतु कोणतीही भाषा सक्तीची केलेली नाही. राज्ये आणि शाळांना कोणत्या ३ भाषा शिकवायच्या हे ठरवण्याचे स्वातंत्र्य आहे.

प्राथमिक वर्गात (इयत्ता पहिली ते पाचवी) शिक्षण मातृभाषेत किंवा स्थानिक भाषेत करावे, अशी शिफारस केली जाते. त्याच वेळी, मध्यम वर्गात (इयत्ता ६ वी ते १० वी) ३ भाषा शिकणे अनिवार्य आहे. हिंदी नसलेल्या राज्यात ती इंग्रजी किंवा आधुनिक भारतीय भाषा असेल. जर शाळेची इच्छा असेल, तर ते माध्यमिक विभागात म्हणजेच अकरावी आणि बारावीमध्ये परदेशी भाषा हा पर्याय देखील देऊ शकते.

तामिळनाडूमध्ये द्विभाषिक सूत्र आधीच लागू आहे. पहिली भाषा तमिळ (मातृभाषा/राज्यभाषा) आहे आणि दुसरी भाषा इंग्रजी आहे (अधिकृत आणि आंतरराष्ट्रीय संवादासाठी). तामिळनाडू सरकार म्हणते की हे मॉडेल यशस्वी झाले आहे आणि विद्यार्थ्यांवर अतिरिक्त भाषेचा भार टाकण्याची गरज नाही.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १८ एप्रिल २०२५

## नामदेव शास्त्रींकडून धनंजय मुंढेंची पाठराखण



**बीड :** भगवान गडाचे महंत नामदेवशास्त्री यांनी गुरुवारी पुन्हा एकदा संतोष देशमुख हत्याकांडामुळे मंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागलेल्या धनंजय मुंडे यांची पाठराखण केली. धनंजय मुंडे यांच्या गालावरून वारे गेले. त्यामुळे एक चांगली वाणी बंद पडली. ही वाणी पुन्हा सुरू व्हावी यासाठी प्रार्थना करा, असे ते म्हणालेत.

बीडच्या शिरूर तालुक्यातील पिंपळनेर येथील श्रीक्षेत्र भगवानगडाच्या नारळी सप्ताहाची आज सांगता झाली. यावेळी आयोजित समारंभात बोलताना नामदेवशास्त्री यांनी धनंजय मुंडे यांची पाठराखण केली. ते म्हणाले, धनंजय मुंडे हे भगवान गडाचे आहेत. त्यामुळे तुम्ही त्यांचे टेन्शन घेऊ नका. आज ते आले नाही. पण त्यांच्यासाठी आपण मोठा कार्यक्रम करू. त्यांच्या गालावरून वारे गेले आहे. कारण, एक चांगली वाणी बंद पडली आहे. त्यामुळे ती पुन्हा सुरू व्हावी यासाठी भगवानबाबाला प्रार्थना करा. त्यांच्याकडून पुन्हा समाजकल्याणाचे काम व्हावे एवढेच मी म्हणेन.

धनंजय मुंडे आजच्या सांगता समारंभाला हजर राहणार होते. पण काही कारणांमुळे त्यांना येता आले नाही. याविषयी बोलताना नामदेवशास्त्री म्हणाले, बीडचे भूमीपुत्र धनंजय मुंडे आज आपल्या कार्यक्रमाला येणार होते. पण त्यांच्या हेलिकॉप्टरला क्लिअरन्स मिळाला नाही. त्यामुळे ऐनवेळी त्यांचा दौरा रद्द झाला. त्यांच्या हेलिकॉप्टरला दोन तास परवानगी मिळाली नाही. ते हेलिकॉप्टरच्या शेजारी बसूनच होते.

उल्लेखनीय बाब म्हणजे धनंजय मुंडे सध्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणामुळे अडचणीत सापडलेत. या प्रकरणी त्यांचे निकटवर्तीय वाल्मीक कराड याला अटक करण्यात आली आहे. त्याच्यावर मकोकाही लावण्यात आली आहे. परिणामी विरोधकांनी टीकेची झोड उठवल्यामुळे धनंजय मुंडे यांनी आपल्या मंत्रिपदाचा राजीनामा दिला आहे. तत्पूर्वी, नामदेव शास्त्री यांनी भगवान गड धनंजय मुंडे यांच्या पाठिशी भक्कमपणे उभा असल्याचे स्पष्ट केले होते. पण या प्रकरणी टीकेची झोड उठल्यानंतर त्यांनी संतोष देशमुख यांच्या कुटुंबीयांना न्याय मिळाला पाहिजे अशी भूमिका घेतली होती. त्यानंतर आता पुन्हा एकदा त्यांनी धनंजय मुंडे यांची पाठराखण केल्यामुळे त्यांच्या भूमिकेवर आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

उल्लेखनीय बाब म्हणजे या कार्यक्रमाला राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते धनंजय मुंडे स्वतः हजर राहणार होते. पण ऐनवेळी त्यांच्या हेलिकॉप्टरमध्ये बिघाड झाल्यामुळे त्यांना आपला दौरा रद्द करावा लागला. त्यांनी एका पोस्टद्वारे याची माहिती दिली. मी पिंपळनेर (ता. शिरूर कासार) येथील संत श्री भगवानबाबा यांच्या परंपरेतील नारळी सप्ताहात येण्यासाठी सकाळी साधारण दहा वाजल्यापासून मुंबई येथील पवन हंस विमानतळावर आहे. मात्र काही तांत्रिक कारणांनी अजूनही उड्डाण करण्यास परवानगी मिळत नसल्याने माझा आजचा पिंपळनेर (शिरूर कासार) दौरा जड अंतःकरणाने रद्द करावा लागतो आहे. अध्यात्मिक कार्यक्रमास आपल्यामुळे विलंब नको म्हणून याबाबत आदरणीय शास्त्री बाबांना कल्पना दिली आहे.

श्री क्षेत्र भगवानगड, आदरणीय महंत न्यायाचार्य ह.भ.प. डॉ. नामदेव महाराज शास्त्री तसेच समस्त पिंपळनेर वासियांची हृदयपूर्वक क्षमा मागतो, असे धनंजय मुंडे यासंबंधी बोलताना म्हणाले.

## 'मु. पो. तालकटोरा' पुस्तकाचे दिल्लीत प्रकाशन संपन्न



पुणे : मराठी भाषेची ओळख कधीच पुसली जाणार नाही. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळवून देणे हा एकच ध्यास घेवून महाराष्ट्र साहित्य परिषदेसह सर्वांनी प्रयत्न केले. दिल्लीतील आंदोलन तसेच सतत पाठपुरावा करून या इच्छेला मूर्त स्वरूप मिळाले आहे. दिल्लीत अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन यशस्वी केले याचे कौतुक आहे. महाराष्ट्र आता मागे वळून पाहणार नाही. दिल्ली आता दूर नाही. दिल्लीच्या तख्तावर महाराष्ट्राची पकड घट्ट झालेली पहायला मिळेल, असा विश्वास महाराष्ट्राचे सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी व्यक्त केला. ९९वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन भरविण्याचा मान साताऱ्यास मिळावा, अशी इच्छाही त्यांनी व्यक्त केली.

सरहद, पुणे आयोजित ९८व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षा डॉ. तारा भवाळकर, स्वागताध्यक्ष शरद पवार आणि उद्घाटक पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या भाषणावर आधारित 'मु. पो. तालकटोरा' या पुस्तकाचे प्रकाशन तसेच मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळविण्यासाठी दिल्ली येथे आंदोलन करणाऱ्या मसापच्या कार्यकर्त्यांचा सत्कार मंत्री भोसले यांच्या हस्ते करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या माधवराव पटवर्धन सभागृहात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी सरहद, पुणेचे अध्यक्ष संजय नहार, अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी, कार्यवाह सुनिताराजे पवार, कोषाध्यक्ष विनोद कुलकर्णी, ज्येष्ठ पत्रकार श्रीराम पवार, सरहद, पुणेचे संचालक डॉ. शैलेश पगारिया, शैलेश वाडेकर व्यासपीठावर होते.

राजकारण्यांना नेहमीच पत्रकार आणि साहित्यिकांची भीती असते असे सुरुवातीस सांगून शिवेंद्रराजे भोसले म्हणाले, माझा साहित्याचा अभ्यास नाही परंतु, आवड नक्कीच आहे. साताऱ्यात साहित्यिक आणि कलाकार यावेत यासाठी मी नेहमीच प्रयत्नशील असतो.साहित्य क्षेत्रात साताऱ्यातील मसाप शाखेच्या माध्यमातून विविध उपक्रम घेतले जात आहेत.सतत कार्यशील असणाऱ्या सातारकरांचा परिषदेवर ठसा उमटला आहे. एखाद्या मंत्र्याचे आंदोलक म्हणून स्वागत व सत्कार इतिहासात पहिल्यांदाच झाला असेल. दिल्ली येथील महाराष्ट्र सदनात मराठी भाषिकांना खुला प्रवेश मिळण्यासाठी तसेच स्पर्धा परिक्षा देणाऱ्या मराठी विद्यार्थ्यांच्या वसतीगृहाची सोय करण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे ते म्हणाले.

प्रा. मिलिंद जोशी म्हणाले, उदारमतवाद आणि वैचारिक मोकळेपणा हे महाराष्ट्राची परंपरा आहे. दिल्लीतील साहित्य संमेलनात वैचारिक मोकळेपणाचे दर्शन घडले. विविध विचारधारांची आणि मतांची माणसे व्यासपीठावर होती; तरीही आपल्या विचारांशी ठाम राहतानाही त्यांच्यातील सौहार्द पाहायला मिळाले.याचीच आजच्या काळात गरज आहे.साहित्य संमेलनाचे अध्यक्ष महाराष्ट्राचे वैचारिक नेतृत्व करतात अशी लोकभावना आहे. ती दृढ करण्याचे काम संमेलनाध्यक्षा डॉ. तारा भवाळकर यांनी आपल्या बाणेदार अध्यक्षीय भाषणातून केले.मराठी माणसांची मानसिकता हेच त्यांच्या समोरचे मोठे आव्हान आहे.

## एकच जिद्द शक्तिपीठ रद्द, शक्तिपीठ महामार्गाला लातूरमधील शेतकऱ्यांचा विरोध

**लातुर :** महाराष्ट्रात अनेक भागांमध्ये शक्तिपीठ महामार्गाला विरोध होताना दिसत आहे. बीड आणि लातूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी देखील या महामार्गाला आपला विरोध कायम ठेवला आहे. महामार्गाच्या मोजणीसाठी आलेल्या अधिकाऱ्यांना या दोन्ही जिल्ह्यातील ग्रामस्थांच्या विरोधाला तोंड द्यावे लागले आहे. त्यामुळे मोजणीसाठी आलेल्या अधिकाऱ्यांना माघारी फिरावे लागले आहे. यावेळी शेतकऱ्यांनी 'एकच जिद्द शक्तिपीठ रद्द', अशी जोरदार घोषणाबाजी केली.

लातूर जिल्ह्यातील चाडगाव येथे शक्तिपीठ महामार्गाच्या मोजणीसाठी महसूल विभागातील अधिकारी व कर्मचारी तसेच ज्या कंपनीला काम देण्यात आले आहे त्या कंपनीचे देखील कर्मचारी आले होते. यावेळी चाडगावसह येथील आजूबाजूच्या जवळपास ८ गावातील शेतकरी एकवटले होते. अधिकारी गावात आल्यावर या शेतकऱ्यांनी जोरदार घोषणाबाजी करण्यास सुरुवात केली. शेतकऱ्यांचा व ग्रामस्थांचा विरोध पाहता मोजणीसाठी आलेल्या अधिकाऱ्यांना माघारी फिरावे लागले आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प म्हणून शक्तिपीठ महामार्ग समजला जातो. मात्र या महामार्गाला विरोध होताना दिसत आहे. लातूर आणि बीड जिल्ह्यातील चडगाव, मोरवड, नांदगाव, सायगाव, भारज, भोकरंबा, दिघोळ देशमुख, रामेश्वर या गावातील शेतकऱ्यांनी आपला विरोध कायम ठेवला आहे. शक्तिपीठ महामार्ग होऊ देणार नाही. यासाठी शेवटपर्यंत आम्ही प्रयत्न करणार, कोणत्याही यंत्रणेला गावात येऊ देणार नाही अशी भूमिका गावकऱ्यांनी घेतली आहे.

बीड आणि लातूर जिल्ह्यातून जाणाऱ्या सुमारे ८७ किलोमीटरच्या शक्तिपीठ मार्गासाठी सुमारे ८५० हेक्टर पेक्षा जास्त जमीन अधिग्रहीत करावी लागणार आहे. याच कारणामुळे मोठ्या संख्येने बाधित लोक एकत्रित येऊन विरोध करत आहेत. शक्तिपीठ महामार्ग बीड जिल्ह्यातील परळी,अंबाजोगाई तसेच लातूर जिल्ह्यातील रेणापूर, लातूर आणि औसा या एकूण पाच तालुक्यातून जाणार आहे. या पाचही तालुक्यतून सुमारे ३५ गावांमधून हा महामार्ग जाणार आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १८ एप्रिल २०२५


## राणे समर्थकांकडून दांपत्याला मारहाण, महिलेचा विनयभंग : वैभव नाईक यांचे गंभीर आरोप



**सिंधुदुर्ग :** जिल्ह्यातील कुडाळ येथील हत्येच्या घटनेने वातावरण तापले आहे. त्यात आता पुन्हा एक अशीच घटना घडली आहे. कणकवली तालुक्यातील सावडाव ग्रामपंचायतमध्ये भ्रष्टाचार होत असल्याचा आरोप केल्याच्या रागातून नयना सावंत आणि वैभव सावंत यांना अमानुष मारहाण केल्याची घटना घडली आहे. ही मारहाण सावडाव येथील उपसरपंच दत्ताराम काटे व त्यांच्या सहकाऱ्यांनी केली असल्याचा आरोप माजी आमदार वैभव नाईक यांनी केला आहे. या संदर्भात वैभव नाईक यांनी फेसबुकवर पोस्ट शेअर करत आरोप केले आहेत.

माजी आमदार वैभव नाईक यांनी फेसबुकवर नयना सावंत आणि वैभव सावंत यांना मारहाण केल्यानंतरचे फोटो शेअर केले आहेत. पोलिसांनी योग्य ती कारवाई केली नाही तर सिंधुदुर्ग जिल्ह्याची बीडचे दिशेने वाटचाल होईल, असे वैभव नाईक यांनी म्हटले आहे. या प्रकरणी कणकवली पोलिसांनी दत्ताराम काटे व इतर सात जणांवर गुन्हे दाखल केले आहेत. मात्र, अद्यापही कोणाला अटक करण्यात आली नाही.

वैभव नाईक यांनी नयना सावंत आणि वैभव सावंत यांना मारहाण झाल्यानंतरचे फोटो फेसबुकवर शेअर करत गंभीर आरोप केले आहेत. सिंधुदुर्गचा बीड करण्याचा राणे समर्थकांचा आणखी एक प्रयत्न, असा आरोप वैभव नाईक यांनी केला आहे.

वैभव नाईक म्हणाले, कणकवली तालुक्यातील सावडाव ग्रामपंचायत मधील विकास कामांमध्ये झालेला भ्रष्टाचार बाहेर काढला म्हणून सावडाव येथील माहिती अधिकार कार्यकर्ते नयना सावंत व वैभव सावंत यांना भाजपचे माजी सरपंच, विद्यमान उपसरपंच आणि राणेसमर्थक दत्ताराम काटे व त्यांच्या सहकाऱ्यांनी अमानुषपणे मारहाण केली तसेच नयना सावंत यांच्या अंगावरील जॅकेट जबरदस्तीने काढले व जॅकेटच्या आत असलेले टी-शर्ट काढण्याचा प्रयत्न करून त्यांचा विनयभंग केला व त्यांना जबर मारहाण केली आहे. तसेच नयना सावंत यांना मनात लज्जा होईल अशी अश्लील वक्तव्ये, शिवीगाळ व धमकी दत्ताराम काटे यांच्याकडून देण्यात आली.आणि वैभव सावंत यांच्या गुप्तांगावर धारधार शस्त्राने जखम करण्यात आली आहे.

या अमानुष मारहाणीमुळे आजही नयना सावंत व वैभव सावंत हे ग्रामीण रुग्णालय व जिल्हा रुग्णालयात उपचार घेत आहेत. मात्र अमानुष मारहाण व विनयभंगाचा गुन्हा घडूनही अद्यापपर्यंत कणकवली पोलिसांनी या आरोपींविरुद्ध कारवाई केलेली नाही. सत्तेत आल्यामुळे राणे समर्थकांची पुन्हा एकदा सिंधुदुर्ग जिल्ह्यात दहशत सुरू झाली आहे. महाराष्ट्र राज्याचे गृहमंत्री आणि महाराष्ट्र राज्य महिला आयोग याची दखल घेणार का? असा सवाल नाईक यांनी उपस्थित केला आहे.

## नियमबाह्य शिक्षण सेवकांच्या भरतीची चौकशी करून संबंधित अधिकारी बडतर्फ करा



**चिखली (महेश मुंढे) :** सन २०२४ मध्ये पवित्र पोर्टल मार्फत शासनाकडून नविन नियुक्त केलेल्या शिक्षण सेवक विहित मुदतीत नियुक्त केलेल्या शाळेवर रूजु न झाल्यामुळे रमेश रतन डुकरे पाटील,गटशिक्षण अधिकारी पं.सं. चिखली जि. बुलडाणा यांनी लाखो रूपये घेऊन शिक्षक सेवकांना नियमबाह्य रूजू करून घेतल्या प्रकरणी तात्काळ उच्च स्तरीय चौकशी करून संबंधीत शिक्षक सेवकांच्या नियुक्त्या रद्द करून गट शिक्षण अधिकारी रमेश रतन पाटील यांना तात्काळ कायमस्वरूपी बडतर्फ करणे बाबत भारतीय मानवाधिकार संघटनेच्या वतीने प्रधान सचिव (शालेय शिक्षण) महाराष्ट्र राज्य मंत्रालय मुंबई-३२,आयुक्त (शिक्षण) नविन प्रशासकिय इमारत पुणे, आयुक्त (अमरावती विभाग अमरावती),शिक्षण संचालक (प्राथमिक) नविन प्रशासकिय इमारत पुणेयांना जिल्हाधिकारी बुलडाणा व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद बुलडाणा यांच्या मार्फत देण्यात आले.तक्रार निवेदन नमूद, दिनांक ११/०३/२०२४ रोजी जि.प. बुलडाणा येथे मुख्य कार्यकारी अधिकारी पदावर श्री. विशाल नरवाडे हे कार्यरत होते. शासनाकडून सन २०२४ मध्ये पवित्र पोर्टल मार्फत शिक्षण सवक पदाकरिता भरती प्रक्रिया राबविण्यात आलेली होती.सदर भरती प्रक्रिये मध्ये उमेदवारांनी शिक्षण सेवक पदासाठी निवड झाली अशा उमेदवारांच्या निवड याद्या बुलडाणा यांचेकडे पाठविण्यात आलेल्या होत्या. सदर उमेदवारांच्या कागदपत्राची पडताळणी होऊन सदर झालेल्या उमेदवारांना आदेश दिलेले होते. सदर नियुक्ती आदेशात निवड झालेल्या उमेदवारांनी नियुक्ती प्राप्त आदेशापासून १५ दिवसांचे आत शारिरीक तपासणी करून नियुक्तीच्या ठिकाणी रूज होणे बंधनकारक होते. तसे मु.का.अ. यांचे आदेशात मुद्दा क्र. २ मध्ये नमुद करण्यात आलेले होते. उमेदवार १५ दिवसांचे आत रुजु न झाल्यास संबंधीत नियुक्ती आदेश रद्द समजण्यात येईल एवढे स्पष्ट आदेश देण्यात आलेले होते.असे असतांना जि.प. बुलडाणा येथून श्री. विशाल नरवाडे यांची मार्च २०२४ मध्ये बदली धुळे येथे झाली त्यांचे जागेवर श्री. मोहन यांचेकडे मु.का.अ.जि.प. बुलडाणाचा प्रभार देण्यात आलेला होता. तदनंतर श्री. कुलदिप जंगम यांची नियुक्ती शासनाने केलेली होती. जुन २०२४ मध्ये श्री. कुलदिप जंगम साहेब मुकाअ पदावर कार्यरत असतांना मुध्दा शिक्षण सेवकांनी दि. ११.०३.२०२४ चे श्री. विशाल नरवाडे यांचे नियुक्ती आदेश पं.स. चिखलीचे गटशिक्षणाधिकारी रमेश रतन पाटील यांचेकडे आणले व रमेश पाटिल यांनी सदर शिक्षण सेवकांकडुन लाखो रूपये घेतले व त्यांना नियमबाह्यरित्या पं.सं. चिखली येथे रुजु करून घेतले. तसे आदेश रमेश पाटील यांनी शिक्षण सेवकांच्या अर्जावर लिखीत स्वरूपात संबधीत लिपीक यांना जुन २०२४ मध्ये आदेश दिलेले आहे, याचा अर्थ असा होतो की, श्री. विशाल नरवाडे मुख्य कार्यकारी अधिकारी बुलडाणा हे मार्च २०२४ मध्ये बदलून गेल्यावर श्री. मोहन मुख्य कार्यकारी अधिकारी व तदनंतर श्री. कुलदिप जंगम मुख्य कार्यकारी अधिकारी हे माहे जुन २०२४ मध्ये कार्यरत असतांना रमेश रतन पाटील गटशिक्षण अधिकारी यांनी सदर शिक्षणसेवकांचे नियुक्ती आदेशावर श्री. कुलदिप जंगम साहेब मुख्य कार्यकारी अधिकारी (मु.का.अ) यांचेकडे मार्गदर्शन मागणे क्रमप्राप्त होते. तसे न करता आपल्या अधिकार क्षेत्राबाहेर जावून रमेश रतन पाटील यांनी पदाच्चा दुरूपयोग करून नियमानुसार नियुक्ती झालेले शिक्षण सेवकांचे आदेश हे नियमबाह्यरित्या शिक्षण सेवकांना कसे रूजु करून घेतले हे संबधीत आदेशानुसार आपल्या लक्षात येईलच.तरी महोदय या सर्व प्रकरणामुळे जे सुशिक्षीत बेरोजगार प्रतिक्षायादीत होते त्यांचेवर एक प्रकारे अन्याय झालेला आहे. वास्तविक ११.०३.२०२४ पासून १५ दिवसांच्या आत निवड झालेले उमेदवार हे नियुक्तीच्या ठिकाणी रूजु न झाल्यास संबंधीत उमेदवारांच्या नियुक्त्या रद्द करून पवित्र पोर्टल म्हणजे शिक्षण आयुक्त पुणे यांच्याकडे अहवाल पाठविणे क्रमप्राप्त होते.या सर्व प्रकरणामध्ये लोखो रूपयांचा भ्रष्टाचार, गैरमार्गानि पैसे घेणे संगनमत करणे असे प्रकार रमेश रतन पाटील गटशिक्षणाधिकारी यांनी केलेले असल्याची चर्चा सर्वत्र होत आहे. त्यांची तात्काळ चौकशी करून त्यांचेवर नियमानुसार गुन्हे दाखल करावे व चौकशी पूर्ण होईपर्यंत त्यांना निलंबीत करावे.व तदनंतर दोषी आढळून आल्यास कायमस्वरूपी बडतर्फे करावे.अन्यथा भारतीय मानवाधिकार संघटने च्या वतीने दि 30 एप्रिल 2025 पासून लोकशाही मार्गाने अन्न त्याग आंदोलनास सुरुवात करण्यात येईल याची नोंद घावी. निवेदन देते वेळी प्रशांत डोंगरदिवे जिल्हा अध्यक्ष, संदीप गवई जिल्हा सचिव, संदीप बोर्डे तालुका अध्यक्ष बुलडाणा, प्रकाश भराड तालुका उपाध्यक्ष चिखली, विरसेन साळवे सल्लागार, गौतम डोंगरदिवे सदस्य यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते.


डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

**मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.**



बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (MPW), आरोग्य निरीक्षक, आरोग्य पर्यवेक्षक, स्वच्छता निरीक्षक

या पदासाठी आवश्यक असलेला शासनमान्य

**Sanitary Health Inspector**

**सॅनेटरी हेल्थ इन्स्पेक्टर**

या कोर्ससाठी प्रवेश चालु आहेत

बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ,पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)

9405109103
8830838903



बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १८ एप्रिल २०२५

# काय सांगू राणी मला गाव सुटंना !



प्रत्येक व्यक्तिच्या जीवनात त्याचा गाव, शिवार, परिसर तिथला निसर्ग, डोंगर , नदी, झाडे , तिथली माती आणि माणसं यांचे अनण्यसाधारण महत्व असते. मग ती व्यक्ति गाव सोडून पोटापाण्यासाठी , नोकरी, व्यावसायाच्या निमित्ताने कुठेही असली तरी तो आपल्या गावाशिवाराला कधीही विसरू शकत नाही. ज्या परिसरात आपले बालपण व्यतित झाले, त्या परिसराशी भावनिक व सामाजिक भावबंध निर्माण होत असतात. लहानपणी च्या अनेक आठवणी मनात रुंजी घालतात. मी नोकरी च्या निमित्ताने 1999 पासून माझे गाव सोडले परंतु माझ्या मनातील गाव कायमचे ठाण मांडूण बसले आहे. ते कदापीही मनातून निघू शकत नाही. आजही मी या माझ्या गावाला विसरू शकलो नाही. वेगवेगळ्या निमित्ताने तर कधी कधी काहीही निमित्त नसतांना माझे पाय कळत नकळत गावाच्या दिशेने ओढू लागतात. जालना जिल्हयातील अंबड तालुक्यात सुखना नदी काठी माझे गाव वसलेले आहे. देशगव्हाण हे त्याचे नाव. या गावाशी साधर्म्य सांगणारे नाव अन्यत्र कुठे दिसत नाही. मात्र गव्हाण लावलेले अनेक गावे आपणास महाराष्ट्रात पहावयास मिळतात. जसे की केळीगव्हाण, रामगव्हाण, नायगव्हाण अशी गावे आहेत. देशगव्हाण हे गाव इतर कोणत्याही भारतीय खेड्यासारखे हे एक खेडे गाव आहे. तसं पाहिलं तर हे गाव चार तालुक्याच्या सीमेवरचं गाव आहे. अंबड, बदनापूर, पैठण आणि छत्रपती संभाजीनगर . सीमेवरची गावे असल्यामुळे ही सर्व गावे विकास व परिवर्तनाच्या चळवळीपासून आजही कोसो दूरच आहेत. काळी कसदार जमिन. माणूस पेरला तरी उगवून येईल. अशी सूपिक जमिन. कपाशी, तूर, बाजरी, ज्वारी, गहू, हरबरा , सोयाबीण ही पीके प्रामुख्याने घेतली जातात. एकेकाळी ज्वारी व मोसंबी या परिसराची ओळख होती. अलिकडे कपाशी हे नगदी व एकमुखी पीक मोठया प्रमाणात घेण्यास शेतकरी वर्ग प्रवृत्तीत झाले आहेत. तसे पाहिले तर हा भाग प्रचंड अवर्षण ग्रस्त आहे. तीन वर्षात एकदा चांगले पर्जन्यमान येथे होते. नव्वद नंतर भरमसाठ वाळू उपसा, प्रचंड वृक्षतोड , अतिक्रमण आणि प्रदूषित सांडपाण्यामुळे सुखना नदी अतिक्रमण व प्रदुषणाच्या विळख्यात सापडली आहे. बारमाही वाहणारी नदी शेवटच्या घटका मोजत आहे. त्यामुळे सततचा दुष्काळ इथल्या माणसांच्या पाचविलाच पुंजलेला आहे. त्यामुळे कर्जबाजारीपणा दिवसेंदिवस वाढतच आहेत. फारशा विकास योजना या भागात राबविल्या न गेल्यामुळे आणि प्रभावी नेतृत्वामुळे अपेक्षित परिवर्तन या भागात झालेले नाही. बहुतांश नेते गावपातळीच्या राजकारणात अडकून पडले आहे. एक दोन नेते तालुक्याच्या राजकारणात या परिसरात धडपडतांना दिसतात मात्र ते आपला प्रभाव पाडू शकत नाही. शिवाय विकासाचा कोणताच अजेंडा नसल्यामुळे फक्त राजकारण व पदापुरतीच त्यांची ओळख आहे. बाळकृष्ण महाराजांचा गावाच्या सुरुवातीलाच भव्य मठ आहे. हेच गावचे प्रमुख श्रद्धास्थान आहे. शिवाय गावात हनुमान मंदिर, महादेव मंदिर, संत भगवान बाबा मंदिर ही आहेत. गाव धार्मिक वळणाचं, संत भगवान बाबा, ह.भ.प. भानुदास महाराज अटाळकर, भीमसिंह महाराज या संत महंताचा परिसस्पर्श गावाला लाभलेला आहे. भजन, कीर्तनात गाव दंग असतो. पारंपारिक सण उत्सव आजही मोठ्या प्रमाणात साजरे केले जातात. पाडवा, दसरा, आषाढी, महाशिवरात्री, पोळा, शिमगा हे सण एकत्र येवून साजरे केले जातात. दरवर्षी डिसेंबर जानेवारी मध्ये बाळकृष्ण महाराजांची पुण्यतिथी मोठया उत्साहाने साजरी केली जाते. अखंड हरिनाम सप्ताह असतो. लोक न चुकता सहभागी होतात. वर्षभर पुरणारी उर्जा साठवून घेतात. पूर्वी गावात नाट्यपरंपरा होती. तीन अंकी नाटके सादर व्हायची. पंचमीला कबड्डी स्पर्धा होत असे. वर्षभर विविध धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रम होतात. श्रावणात पोथी वाचन केले जाते. गाव वाड्या वाड्यात विभागलेले. सर्व जाती धर्माचे लोक गुण्या गोविंदाने वागतात. शिक्षणाचे व नोकरीचे प्रमाणही गावात चांगलेच आहे. असे हे माझे गाव मला खूपच आवडते. याच गावात माझे बालपण व्यतित झाले. ईथल्या गाव शिवारात पायपीट झालेली. शेतीमाती चे संस्कार याच गावाने मला दिले. समता, मानवता, बंधूता, या मुल्यांची रुजवणूक येथेच झाली. राजकीय, सामाजिक कार्याचे बाळकडू याच गावमातीने दिले. सुखना नदीत गेलेले बालपण, जामुवंतगड, वाहेगावचा बाजार व उरूस, शेकटयाचा ऊरूस , गावात होणारे भजन, कीर्तन , भारूड, गोंधळ, जागरण या कार्यक्रमाने माझी सांस्कृतिक जडणघडण झाली. अनेक नेत्यांच्या सभा, भाषणे ऐकली. त्यातून राजकीय समज दृढ होत गेली. आजही मी कुठेही असलो तरी गावाकडे माझी महिन्याला चक्कर होतच असते. अगदी लहान पणापासून या माझ्या गावाशी माझी घट्ट नाळ जोडलेली आहे ती आजपर्यंत कायम आहे. 1999 साली मी नोकरी निमित्त कन्नडला आलो नी कायमचे कन्नडवासी झालो तरी गावाशिवाराची ओढ , तिथल्या माती आणि माणसांशी असलेले दृढ नाते मला गावापासून कधीही तोडू शकले नाहीत. पुढेही तोडतीय असे मला अजिबात वाटत नाही. इतका मी या माझ्या गावाशी जोडला गेलो आहे. गावची यात्रा असो की, कुणाचे लग्न कार्य, सुख दुःखद प्रसंग, आदी महत्वाच्या कार्याबरोबरच प्रासंगिक स्वरूपात होणाऱ्या कार्यक्रमास मी आवर्जून उपस्थित राहातो. खरं तर प्राध्यापक, कवी, लेखक, वक्ता, संपादक आणि सामाजिक कार्यकर्ता म्हणून काम करतांना प्रचंड ओढातान होते. प्रसंगी वेळही कमी पडतो. तरीही मी वेळात वेळ काढून गावाकडे आवर्जून जातो म्हणजे जातोच. ते ही न विसरता. खूप नैराश्य आले. अहंकार जाणवायला लागला, की मला माझ्या गावाकडची माणसं आठवतात. त्यांचं जगणं आठवत. त्यांच्या वाट्याला आलेला संघर्ष आठवतो , प्रचंड दारिद्रय आठवते या माणसात जावं , त्यांच्याशी हितगुज करावी, त्यांच्या जीवन मरणाच्या प्रश्नावर चर्चा करावी. गावा शिवारात भटकंती करावी. आपल्या जीवाभावाच्या माणसांशी प्रत्यक्ष भेटून संवाद साधावा. डोळाभरून त्यांना पहावं अनुभवावं आणि गावातील अनेकांच्या घरी जावून त्यांचा प्रेमाचा व आनंदाचा चहा घ्यावा हे माझे नित्याचेच झाले आहे. येणारे जाणारे विचारपूस करतात. ख्याली खुशाली विचारतात त्यामुळे ताण तणाव कमी होतो. नैराश्याचे ढग घोंघावत नाही. एकटा असूनही मला कधीही एकटेपणा वाटला नाही. कारण या गावा शिवारात मी माझी जीवाभावाची सर्व जाती धर्माची माणसे आजही जोडून ठेवली. त्यांच्या विषयी चा स्नेहभाव तसाच जपून ठेवला आहे. त्यामुळेच मला या माणसांकडे जावे वाटते. त्यांना भेटावेसे व बोलावेसे वाटते. त्यांना भेटून बोलून, गावाशिवारात भटकंती करून मन मोकळे होते. कोणताही व्देष, अहंभाव, जात पात आदी काहीही डोक्यात शिरत नाही. गावाकडे गेलो की, माझे पाय नकळतपणे सुखना नदी कडे ओढतात. याच सुखना नदी काठी सुखना केटी वेअरवर बसून मी तासनतास मित्रासोबत चर्चा केली. सुखना नदीच्या पाण्यात , तिथल्या मोठया नळाच्या व लहान्या नळाच्या डोहाच्या पाण्यात मनसोक्त पोहलो. सुखना नदी पात्रात व्यायाम केला. कबड्डी खेळलो. सुखनाच्या वाळूत मनसोक्त लोळलो .ते दिवस आठवले की आजही आठवणींचा डोह मनात रुंजी घालतो. गावातील तरुण पिढी, विद्यार्थी, शेतकरी, नातेवाईक यांच्याशी संवाद साधतो. बदलत्या जीवनावर प्रश्नावर चर्चा करतो त्यावर उपाय सूचवतो. भावकीतील माणसांच्या भेटागाठी घेतो. मला स्वतःच्या घरी फारसा वेळ गावाकडे गेल्यावर मिळत नाही. सौंदडीचे शेत, हिवराचे शेत या आमच्या शेतात भटकंती होतच असते. मठावरचे व मारुतीचे दर्शन, महादेव मंदिर, संत भगवान बाबा मंदिरात दर्शन घ्यायचे. शाळेकडे सहज कटाक्ष टाकायचा. सर्वांशी बोलून भेटून मन भरलं की मग मात्र परतीच्या प्रवासाला निघायचे. हा माझा गावाकडचा दिनक्रम अगदी वीस पंचवीस वर्षापासून जसाचा तसाच ठरलेला आहे. त्यात आता फारसा बदल होत नाही. मी वेगवेगळ्या निमित्ताने महाराष्ट्र भर व बाहेरही फिरलो मात्र मला माझ्या गावाची, शिवाराची तिथल्या माणसांची आठवण कायम येतेच . मी कुठेही आणि कसाही असलो तरी गावाकडची माझी भेट कधीही टळत नाही. इतके माझे माझ्या देशगव्हाण या गावाशी घट्ट नाळ जोडलेली आहे. मला खरा आनंद मिळतो तो याच ठिकाणी . मला सुखावणारे क्षण मी आजही माझ्या काळीज कुपीत मी साठवून ठेवले आहे. माझ्या या गावाचे माझ्यावर अनंत रूण आहेत. ते माझ्या परीने मी फेडण्याचा प्रयत्न करीनच. माझ्या काळजात रुतून बसलेले माझे गाव माझ्या जीवनाचा एक अविभाज्य भाग आहे. गावा विषयीचे लेख, कविता, पुस्तके मी वाचली आहे. माझ्या लेखनातून मी माझा गाव तिथली माणसं त्यांचे सुखदुःख विविध प्रश्नासह शब्द बद्ध करून अजरामर केले आहे. सर्वच जण म्हणतात गावाकडे एवढे काय आहे. ? मला मात्र गाव सुटत नाही. यावरून मला महाराष्ट्रातील युवा व्याख्याते गणेश शिंदे यांचे गीत पुन्हा पुन्हा गुणगुणावेसे वाटते., नकळतपणे मला ते गाणे माझ्या ओठावर येते आणि म्हणावेसे वाटते, काय सांगू राणी मला गाव सुटंना !

**प्रा. डॉ. शिवाजी भिकाजी हुसे**
**मो. नं. ९४०४०००३९८**

**बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002**

**महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.**
**कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.**
**संपर्क क्र. 7588005002**

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १८ एप्रिल २०२५


## मेव्हणीला औषधात गुंगीची गोळी देऊन केला बलात्कार

**पुणे :** वारजे परिसरात रहाणाऱ्या एका कुटुंबातील ३६ वर्षीय दाजीने मेव्हणी घरी रहाण्यास आल्यानंतर तिला डोके दुखत असल्याने दोन गुंगीच्या गोळया खाण्यास दिल्या. त्यानंतर घरात कोणी नसल्याची संधी हेरुन १८ वर्षीय मेव्हणीवर बलात्कार करण्यात आल्याचा प्रकार घडला आहे. तसेच याबाबतची वाच्यता कुठे करु नको अन्यथा शारिरिक संबंधाचे फोटो सोशल मिडियावर व्हायरल करण्याची धमकी देखील देण्यात आल्याची तक्रार पिडितेने वारजे पोलिस ठाण्यात दिली आहे. त्यानुसार आरोपीवर बलात्कार, धमकावणे आदी कलमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सदरचा प्रकार ३ ऑक्टोबर २०२४ ते १२ ऑक्टोबर २०२४ दरम्यान घडलेला आहे. पिडित तरुणी ही बहिणीचे घरी असताना, घरातील लोक नवरात्री निमित्त यात्रेसाठी बाहेर गेले होते. त्यावेळी तिचे डोके दुखत असल्याने ती घरीच असल्याने दाजीने तिला दोन गोळया खाण्यास दिल्या. त्यामुळे तिला गुंगी आली त्याचदिवशी संधीचा गैरफायदा घेऊन आरोपीने तिची इच्छा नसताना देखील ती गुंगीत असताना, तिच्यावर जबरदस्तीने शारिरिक संबंध केले. तसेच तु आपल्या मध्ये झालेल्या शारिरिक संबंधा बद्दल कोणाला काही सांगितल्यास फोटो व्हायरल करण्याची धमकी दिली. तक्रारदार हिच्या दाजीने तिच्या सोबत जबरदस्तीने केलेल्या शारिरिक संबंधाचे फोटो तिच्या सासरकडील घरी येऊन तिच्या पतीस दाखवले. तसेच तिच्या कतीला शिवीगाळ करुन त्याचे सोबत भांडण केल्याचा प्रकार घडला आहे. याबाबत पुढील तपास सहाय्यक पोलिस निरीक्षक एस पाटील करत आहे.

वारजे परिसरातच रहाणाऱ्या एका १९ वर्षीय तरुणीचा एका ओळखीच्या तरुणाने सतत पाठलाग करुन तिच्यावर प्रेमसंबंध ठेवण्यासाठी जबरदस्ती केली. तिची इच्छा नसताना देखील आरोपीने त्याच्यासोबत लग्न कर, तु माझ्याशी लग्न केले नाही तर तुझं लग्न होऊ देणार नाही तसेच फोटो इन्स्टाग्राम, फेसबुकवर व्हायरल करील अशी धमकी दिली. तु माझ्याशी लग्न केले नाही तर मी तुझ्या घरासमोर येवून विष पिऊन जीव देईल नाहीतर करंट लावून घेतो असे म्हणून धमकी देऊन शिवीगाळ केल्याचा प्रकार घडला आहे. याबाबत आरोपीवर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

## काँग्रेसचाही हिंदीच्या सक्तीला विरोध : विजय वडेट्टीवार



**मुंबई :** महाराष्ट्रात इयत्ता पहिलीपासून हिंदी भाषेची सक्ती करण्याच्या मुद्यावरून मोठे रणकंदन माजले आहे. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी या हिंदीकरणाला कडाडून विरोध करण्याची भूमिका घेतल्यानंतर आता काँग्रेसनेही हिंदीच्या सक्तीला विरोध केला आहे. तिसरी भाषा म्हणून हिंदी लादणे हा मराठीवरील अन्याय व मराठी अस्मितेवरील घाला आहे, असे काँग्रेसने या प्रकरणी म्हटले आहे.

राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेने म्हणजेच एससीईआरटीने 'राज्य शालेय अभ्यासक्रम आराखडा 2024' तयार केला आहे. त्यात मराठी व इंग्रजी माध्यमांच्या शाळांमधील इयत्ता पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्यांना मराठी व इंग्रजीसह हिंदी ही तृतीय भाषा म्हणून सक्तीची केली आहे. काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी हिंदीची सक्ती करणारा हा निर्णय मराठी भाषिकांच्या अस्मितेवरील घाला असल्याचा आरोप केला आहे.

विजय वडेट्टीवार म्हणाले की, संघराज्य निर्मितीच्या वेळी भाषेला प्राधान्य देताना राज्यांची मातृभाषा मान्य केली गेली. महाराष्ट्राची मातृभाषा मराठी आहे. इंग्रजी व मराठी या दोन भाषा शिक्षण व प्रशासनात वापरल्या जातात. अशा परिस्थितीत तिसरी भाषा म्हणून हिंदी सक्तीने लादणे हा मराठीवरील अन्याय आहे. मराठी भाषिकांच्या अस्मितेवर घाला आहे. सरकारला तिसरी भाषा हवीच असेल तर ती पर्यायी असावी. तिची सक्ती करू नये.

हिंदीची सक्ती करणे हा एकप्रकारे केंद्रातून राज्यांवर दबाव टाकण्याचा प्रयत्न आहे. हा प्रकार संघराज्य व्यवस्थेच्या मूलभूत तत्त्वांना धरून नाही. काही राज्यांनी याला विरोध केला आहे. पण त्यांना धमकावले जात आहे, ही चिंता वाढवणारी बाब आहे. मराठी अस्मिता आणि भाषिक अधिकार रक्षणासाठी ही सक्ती तत्काळ मागे घेतली पाहिजे, असे ते म्हणाले.

दुसरीकडे, मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी या प्रकरणी अत्यंत कडक भूमिका घेतली आहे. केंद्र सरकारचं सध्या जे सर्वत्र 'हिंदीकरण' करण्याचे प्रयत्न सुरू आहेत, ते या राज्यात आम्ही यशस्वी होऊ देणार नाही. हिंदी ही काही राष्ट्रभाषा नाही. ती देशातील इतर भाषांसारखी एक राज्यभाषा आहे. ती महाराष्ट्रात का म्हणून पहिलीपासून शिकायची? तुमचं त्रिभाषेचं सूत्र जे काही आहे ते सरकारी व्यवहारांपुरतंच मर्यादित ठेवा, त्याला शिक्षणापर्यंत आणू नका.

या देशात भाषावार प्रांतरचना झाली, आणि ती इतकी वर्ष टिकली. पण आत्ताच ही दुसऱ्या प्रांताची भाषा इथे महाराष्ट्रावर लादण्याचे प्रकार का सुरु झालेत? भाषावार प्रांतरचनेच्या तत्वालाच हरताळ फासला जात आहे. आम्ही हिंदू आहोत पण हिंदी नाही आहोत ! महाराष्ट्रावर हिंदीकरणाचा मुलामा द्यायचा प्रयत्न कराल तर महाराष्ट्रात संघर्ष अटळ आहे, असे राज ठाकरे यांनी म्हटले आहे.

## एमपीएससी परीक्षा एक महिना पुढे ढकलली

मुंबई : महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे घेण्यात येणारी परीक्षा एका महिना पुढे ढकलण्यात आली आहे. २६ ते २८ एप्रिल कालावधीत आयोजित केलेली परीक्षा आता २७, २८ व २९ मे या कालावधीत होईल. याबाबत आयोगाच्या वतीने शुद्धिपत्रक काढून माहिती देण्यात आली आहे. या बदलामुळे तयारी करत असलेल्या विद्यार्थ्यांना एक महिन्याचा अतिरिक्त वेळ मिळेल. या अतिरिक्त वेळेचा उपयोग ते आपल्या तयारीसाठी करू शकतील.

जारी केलेल्या शुद्धिपत्रकात म्हटले की, महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित संयुक्त पूर्व परीक्षा-2024 मधील राज्य सेवा पूर्व परीक्षा 2024 करीता दिनांक 12 मार्च, 2025 रोजी निकाल प्रसिद्ध करण्यात आला होता. प्रस्तुत पूर्व परीक्षेच्या निकालातून पात्र ठरलेल्या काही EWS अथवा OPEN मधून SEBC अथवा OBC विकल्प निवडलेल्या उमेदवारांना मुख्य परीक्षेचा अर्ज करताना त्यांच्या अर्जामध्ये सुधारित विकल्प दिसून न आल्याने यासंदर्भात उमेदवारांकडून निवेदने प्राप्त झाली होती.

(1) महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित संयुक्त पूर्व परीक्षा-2024 करीता परीक्षेपूर्वी दिनांक 24 जुलै, 2024 रोजीच्या शुद्धिपत्रकाद्वारे आयोगातर्फे Link उपलब्ध करून देण्यात आली होती त्यावेळी सदर शुद्धिपत्रकानुसार एसईबीसी अथवा इ.मा.व. प्रवर्गातील विकल्प दिलेल्या उमेदवारांकडून NCL "Yes" किंवा "No" असा दावा करण्याबाबत सूचित करण्यात आले होते. तथापि, महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित संयुक्त पूर्व परीक्षा-2024 करीता एसईबीसी अथवा इ.मा.व. वर्गवारीचा विकल्प दिलेल्या बऱ्याच उमेदवारांनी NCL संदर्भात "Yes" किंवा "No" असा कोणताही दावा केलेला नसल्याने, अशा उमेदवारांचा मूळ अर्जातील दावा कायम राहिला.

(2) प्रस्तुत प्रकरणी उमेदवारांकडून प्राप्त झालेली निवेदने विचारात घेऊन महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित संयुक्त पूर्व परीक्षा-2024 करीता ज्या अराखीव अथवा आ.दु.घ. वर्गवारीतील उमेदवारांनी एसईबीसी अथवा इ.मा.व. असा विकल्पाचा दावा केला आहे, परंतु NCL बाबत कोणताही दावा केला नाही, अशा उमेदवारांना त्यांनी यापूर्वी आयोगाच्या शुद्धिपत्रकास अनुसरून दिलेल्या विकल्पाच्या दाव्यानुसार त्यांचा एसईबीसी अथवा इ.मा.व. वर्गवारीचा पूर्व व मुख्य परीक्षेसाठी दावा त्यांचे NCL प्रमाणपत्र मुलाखतीच्या टप्यावर तपासण्याच्या अटींच्या अधीन राहून ग्राह्य धरण्याचा निर्णय घेण्यात आला व यासंदर्भात दिनांक 29 मार्च, 2025 रोजी शुद्धिपत्रक प्रसिद्ध करण्यात आले. तसेच या निर्णयामुळे दिनांक 12 मार्च, 2025 रोजीच्या निकालामध्ये सुधारणा करून सुधारित निकाल दिनांक 29 मार्च, 2025 रोजी प्रसिद्ध करण्यात आला. सुधारित निकालाप्रमाणे नव्याने पात्र ठरलेल्या आ.दु.घ. वर्गवारीतील 318 उमेदवार मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरले.

2. राज्य सेवा पूर्व परीक्षा 2024 च्या सुधारित निकालानुसार नव्याने पात्र ठरलेल्या या 318 उमेदवारांना राज्य सेवा मुख्य परीक्षा 2024 च्या पूर्वतयारीसाठी पुरेसा अवधी मिळाला नसल्यामुळे दिनांक 26 ते 28 एप्रिल, 2025 या कालावधीत नियोजित मुख्य परीक्षा पुढे ढकलण्याबाबत उमेदवारांकडून आयोगास निवेदने प्राप्त झाली आहेत. उमेदवारांकडून प्राप्त निवेदने तसेच इतर सर्व बाबींचा साकल्याने विचार करून प्रस्तुत राज्य सेवा मुख्य परीक्षा 2024 सुधारित वेळापत्रकानुसार दिनांक 27, 28 व 29 मे, 2025 या कालावधीत घेण्यात येईल. आरक्षणाच्या अनुषंगाने उद्भवलेल्या असाधारण परिस्थितीचा विचार करून परीक्षेच्या वेळापत्रकातील प्रस्तुत बदल हा एकवेळची अपवादात्मक बाब म्हणून आयोगाकडून सदर निर्णय घेण्यात आला आहे.

3. विषयांकित परीक्षेसाठी दिनांक 18 मार्च 2025 रोजी प्रसिद्ध अधिसूचना तसेच दिनांक 29 मार्च, 2025 आणि 04 एप्रिल, 2025 रोजी प्रसिद्ध शुद्धिपत्रकामधील इतर अटी व शर्तीमध्ये कोणताही बदल नाही.

## वादळ...

घोंगावत येते वादळ
काही क्षणासाठी !
उद्ध्वस्त करून जाते
आयुष्य भरासाठी..

विस्कटतात घरेदारे
घालते थैमान !
मोडतात घरटी झाडे
बदलते आयुष्यमान..

निसर्गाचे हे चक्र
करते फजिती !
जणू सुड घेते
मानवाचा नियती..

अशी कैक वादळे
येतात आयुष्यात !
धैर्याने तोंड द्यावे
अशा या संकटात...

**अनिल दाभाडे**
**मोबा..७०२८१३८०६०**